श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558
mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

## पुर्नदरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषयः— माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (६ दिवस) महाप्रसादाचे भोजन तयार करावयाच्या मजुरीबाबत**

माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (६ दिवस) महाप्रसादाचे भोजन तयार करण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात आली होती. उपरोक्त कामाकरीता न्यासास प्राप्त झालेली तीन मोहोरबंद दरपत्रके गुरूवार दि. २३ जानेवारी, २०२५ रोजी सांयकाळी ५.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षामध्ये उघडण्यात आली. यावेळी प्राप्त तीन दरपत्रकांमध्ये तांत्रिक कागदपत्राअभावी एकाच दरपत्रकधारकाचे दरपत्रक पात्र झाल्याने विहितप्रकियेनुसार सदर कामाकरीता पुर्नदरपत्रके मागविण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार दरपत्रकधारकांनी खालीलप्रमाणे नमूद सुधारित वेळापत्रकाची नोंद घेऊन तातडीने दरपत्रके सादर करावीत. दरपत्रके सादर करताना तांत्रिक कागदपत्रे आणि मुल्य दरपत्रक दोन वेगवेगळया मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावीत..

याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | --: | सोमवार दि. २७ जानेवारी, २०२५ दु. १२.०० वा. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | --: | सोमवार दि. २७ जानेवारी, २०२५ दु. ३.०० वा. |

Vpatil
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

## पुर्नदरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषयः— माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (६ दिवस) महाप्रसादाचे भोजन तयार करावयाच्या मजुरीबाबत**

माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत (६ दिवस) महाप्रसादाचे भोजन तयार करण्याच्या मजूरीबाबत मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

### अटी व शर्ती

१) दरपत्रकात नमूद दिवसांकरीता महाप्रसादाचे भोजन बनविण्याच्या कामाचे दरपत्रक स्विकारल्यानंतर गुरूवार दि. ३० जानेवारी, २०२५ पासून ते मंगळवार दि. ०४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीपर्यंत काम करणे आवश्यक आहे.

२) दरपत्रकामध्ये नमूद दिवसांकरीता मजूरीचे दर नमूद करणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये सर्व समावेशक खर्चासह मूळ दर असावा व कर अतिरीक्त असा उल्लेख करावा.

४) प्रत्येक कंत्राटदाराने फक्त १ मोहोरबंद दरपत्रक सादर करावे. मोहोरबंद लिफाफ्यावर कामाच्या विषयाबाबतचा उल्लेख असावा.

५) कंत्राटदाराने सेवाकर क्रमांक/कंपनी नोंदणी दाखला, पॅन कार्ड दरपत्रकात नमूद करून त्यांची छायाप्रत सोबत जोडावी.

६) कंत्राटदारास मंदिरातील महाप्रसादाचे भोजन बनविण्याचा तसेच कॅटरींग कामाचा पाच वर्षाचा अनुभव सादर करणे असणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या कंपनीची वार्षिक उलाढाल १० लक्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. त्यासाठी सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७) श्रीसिध्दिविनायक दैवतेप्रती आणि हिंदू संस्कृती रितीरिवाजाप्रती श्रध्दा/आस्था असणाऱ्या कॅटरर्स यांनाच सदर महाप्रसादाचे भोजन बनविण्याचे मजूरी कामाचे दरपत्रक सादरीकरण प्रक्रियेत सहभागास न्यासाकडून प्राधान्य दिले जाईल. तसेच सदरहू कंत्राटदाराकडुन पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळासाठीही सदर अट लागु राहिल.

८) पुजारीवर्गाकरीता जेवण बनविणे, वाढणे याकरीता ब्राम्हण आचारी आणि मदतनीस देणे बंधनकारक असेल.

९) स्वयंपाकाकरीता लागणारा सर्व कच्चा माल (किराणा माल), भाजीपाला व गॅस न्यासातर्फे कंत्राटदारांना पुरविण्यात येईल.

१०) अल्पोपहार व महाप्रसादाचे भोजन बनविण्याच्या संपूर्ण पूर्वतयारीसह स्वयंपाक वाढणे, ताटे—भांडी धुणे, चपात्या/पुरी करणे व इ. कामे करणे तसेच स्वयंपाकाकरीता लागणारी सर्व भांडी, गॅस शेगडया, टेबल—खुर्च्या (कव्हरसहीत), पर्याप्त मनुष्यबळ कंत्राटदारास आणावी लागतील त्यांची पुर्णतः जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. पुरविण्यात येणारे कामगार व्यवस्थित गणवेशात असणे आणि जेवण बनविताना स्वच्छतेबाबत विशेष काळजी बाळगणे आवश्यक राहिल.

११) कंत्राटदारास देयकाची रक्कम कंपनीच्या नावे आर.टी.जी.एस.द्वारे अदा करण्यात येईल.

१२) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१३) आपात्कालीन परिस्थितीत उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१४) दरपत्रकधारकाने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकीत करुन सादर करावयाची कागदपत्रे

(अ) आयकर नोंदणी पॅनकार्ड (ब) कंपनी नोंदणी दाखला/सेवाकर जी एस टी नोंदणी दाखला

(क) अनुभव प्रमाणपत्र व वार्षिक उलाढालीसंबंधित प्रमाणपत्र

१५) सिलबंद लखोटयावर दरपत्रक सूचना दिनांक व सूचनेत नमूद विषयाचा उल्लेख करण्यात यावा.

१६) पुर्नदरपत्रके भरताना तांत्रिक कागदपत्रे आणि मुल्य दरपत्रक दोन वेगवेगळया मोहोरबंद लखोटयात **सोमवार, दि. २७.०१.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत** न्यासाच्या नोंदणी शाखेत सादर करावीत.

१७) **सोमवार, दि. २७.०१.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता** तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंत्राटदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी कृपया उपस्थित रहावे.

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 mahaprasad @siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

## दरपत्रकाचा तपशील

**विषयः—माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत नाष्टा व महाप्रसादाचे भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याबाबत**

नावः————————————————————————

पत्ताः————————————————————————

————————————————————————

पॅनकार्ड क्रमांक :————————————————————

सेवाकर नोंदणी क्रमांक :————————————————————

| अ. क्र. | | कामाचा तपशील | प्रति दिन व्यक्तींकरीता | एकत्र मजुरी दर रुपये एकूण ५ दिवसांकरीता (कर वगळून—सर्व समावेशक खर्चासह मूळ दर) |
|---|---|---|---|---|
| १ | अ | **दिनांक ३०, ३१ जानेवारी, २, ३, फेब्रुवारी, २०२५, या एकूण चार दिवसांकरीता** | | रुपये................/— |
| | | अ) सकाळचा नाष्टा (बुफे) | ३०० | |
| | | ब) दुपारचे ब्रम्हवृंद भोजन पंगत | ३५ | |
| | | क) दुपारचे भोजन पंगत | ६०० | |
| | | ड) रात्रौ ब्रम्हवृंद भोजन पंगत | १५ | |
| | | इ) रात्रीचे भोजन पंगत | २५० | |
| | ब | **दिनांक १ व ४ फेब्रुवारी, २०२५ या एकूण दोन दिवसांकरीता** | | |
| | | अ) सकाळचा नाष्टा (बुफे) | ३०० | |
| | | ब) दुपारचे ब्रम्हवृंद भोजन पंगत | ३५ | |
| | | क) दुपारचे भोजन पंगत | १५०० | |
| | | ड) रात्रौ ब्रम्हवृंद भोजन पंगत | १५ | |
| | | इ) रात्रीचे भोजन पंगत | २५० | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558
( Controlled by Govt. of Maharashtra)
mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

विषयः— माघी श्री गणेश जयंती उत्सव कालावधीत नाष्टा व महाप्रसादाचे भोजन बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्याबाबत.

पदार्थांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | पदार्थांचा तपशील |
|---|---|
| १ | साधा भात, मसाले भात/पुलाव (दोन्ही प्रकार) |
| २ | दोन भाज्या (सुकी भाजी व रस्सा भाजी) |
| ३ | डाळ (साधे वरण व आमटी) |
| ४ | गोड पदार्थ (उकडीचे व तळलेले मोदक, पुरणपोळी, बासुंदी, हलवा, गुलाबजामुन श्रीखंड आणि इतर) |
| ५ | फरसाण पदार्थ (भजी/कोथिंबीर वडी/अलु वडी/कटलेट /बटाटा वडा/इतर) |
| ६ | चपाती/पुरी |
| ७ | कोशिंबीर, पापड, सलाड, लोणचे, दही, ताक/सोलकढी इतर |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 mahaprasad@siddhivinayak.org
www.siddhivinayak.org

| दिनांक | वेळ | माघी महोत्सवातील जेवणाचे पदार्थ |
|---|---|---|
| गुरूवार ३० जानेवारी २०२५ | सकाळचा चहा व नाष्टा | पोहे, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, शेंगा आमटी, कुर्मा भाजी, बटाटा भाजी, पोळया, मिक्स भजी, चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, गुलाबजामुन |
| शुक्रवार ३१ जानेवारी २०२५ | सकाळचा चहा व नाष्टा | बटाटा वडा, चटणी, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, अळुभाजी, छोले रस्सा, कोबी चनाडाळ, पोळया, कोथिंबीर वडी, चटणी, कोशिंबीर (मिक्स), लोणचे, पापड, ताक, गाजर हलवा |
| शनिवार ०१ फेब्रुवारी २०२५ | सकाळचा चहा व नाष्टा | साबुदाणा खिचडी, (बटाटावडा) नारळ चटणी, गोड दही, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, वटाणा मसाले भात, सुक्की बटाटा, डाळींबी उसळ, पुरी, मटार पॅटीस, गोड चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, उकडीचे मोदक, श्रीखंड |
| रविवार ०२ फेब्रुवारी २०२५ श्री गणेश जयंती | सकाळचा चहा व नाष्टा | इडली, चटणी, सांबार,चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, भेंडीफ्राय, मटकी उसळ, पोळया, कटलेट, चटणी, लोणचे, पापड, ताक, दही, बासुंदी |
| सोमवार ०३ फेब्रुवारी २०२५ | सकाळचा चहा व नाष्टा | उपमा, नारळ चटणी चहा/कॉफी |
| | दुपारचे जेवण | वरण भात, मसाले भात, सार, मटार पनीर, तोंडली रस्सा, पोळया, अळुवडी, गोड चटणी, गाजर टॉमेटो कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, पुरणपोळी, दुध, तुप |
| मंगळवार ०४ फेब्रुवारी २०२५ | सकाळचा चहा व नाष्टा | मेदुवडा, चटणी, सांबर, साबुदाणा वडा, चहा, कॉफी |
| | दुपारचे जेवण | पुलाव, शेंगा वरण/कैरी वरण, भरली वांगी, कोबी चनाडाळ, कोथींबीर वडी, पोळया, चटणी, कोशिंबीर, लोणचे, पापड, ताक, जिलेबी, |
| गुरूवार दि. ३० जानेवारी २०२५ ते मंगळवार दि. ०४ फेब्रुवारी २०२५ | दररोज रात्रीचे जेवण | आमटी, भात, दोन भाज्या, गोड पदार्थ, भजी, पुरी/चपाती, लोणचे, पापड |